जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 4 JUL 2021 सकाळ

# जिल्हा युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

टेंबलाईवाडी, ता. १३ : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व न्यू कॉलेजच्यावतीने आयोजित



चाळीसाव्या युवा महोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर महोत्सव होणार आहे. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग या संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विविध सभागृहांतील सदस्यांचे स्वागत करून न्यू कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवाच्या वर्षी युवा महोत्सव आयोजित करण्याची जबाबदारी दिली याबद्दल विद्यापीठाला धन्यवाद दिले.



कोल्हापूर : युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. गुरव म्हणाले की, जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. विविध १९ कला प्रकारांमध्ये साडेचारशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. पाटील यांनी कोरोनाच्या प्रादुर्भावातही विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्याचे मोलाचे कार्य केले आहे, असे सांगून भविष्यातही शिवाजी विद्यापीठाच्या प्रत्येक उपक्रमामध्ये न्यू कॉलेजचा सहभाग निश्चितपणे असेल, असे सांगितले. प्रा. रघुनाथ ढमकले यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. एम. ए. शेख यांनी आभार मानले.

14 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो स्ट्रक्चर सेलमुळे घर होणार 'पॉवर हाउस'

**फोटोकॅटॅलिसिस, सौरघट या विषयात संशोधन करणाऱ्या जगभरातील संशोधकांमध्ये पहिल्या १५० शास्त्रज्ञांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा समावेश आहे. तर देशांतर्गत यादीत दुसरा क्रमांक आहे. नुकतीच ही यादी प्रसिद्ध झाली. एका अर्थाने डॉ. पाटील यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या संशोधनाची मोहर उमटवली. या निमित्ताने त्यांच्याशी साधलेला संवाद.**

**प्रश्न-आपण सौरघट संशोधनात कोणते संशोधन करत आहात?**

उत्तर -घरावर सौरघटाचे पॅनल बसवतो. त्यामध्ये सिलिकॉन सेल असतात. त्यामुळे ते महाग मिळतात. तसेच ते केवळ छतावर लावले जातात. सध्या आपण नॅनो स्ट्रक्चर सेलवर संशोधन करत आहे. सोलर पॅनलमध्ये सिलिकॉन सेल ऐवजी नॅनो स्ट्रक्चर सेल वापरले गेले तर सोलर पॅनलची किंमत कमी होईल. त्यामुळे सौरउर्जे पासून वीज निर्मितीचे प्रमाण वाढेल. सिलिकॉन सेलची क्षमता नॅनो सेलपेक्षा अधिक आहे. त्यामुळे नॅनो स्ट्रक्चर सेलची कार्यक्षमता अधिक वाढावी यासाठी संशोधन सुरू आहे. भारतासह जगभरातील शास्त्रज्ञ प्रयत्न करत आहेत. लवकरच त्यात यश येईल. त्यानंतर देशात नॅनो स्ट्रक्चर सेल असणारी मोठी पॅनेल उभारली जातील. घरांना या पॅनेलचीच भिंत असेल. त्यामुळे प्रत्येक घर पॉवर हाऊस बनेल. आपल्याकडे सूर्यकिरणे तिरपी असतात. त्यामुळे सिलिकॉन सेल असणारी पॅनेल तिरकी किंवा आडवी लावावी लागतात. नॅनो स्ट्रक्चर सेल असणारी पॅनेल भिंतीवर उभी बसवली जातील. तरीही ते पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती करतील. या संशोधनात भारताने पुढाकार घेतला असून शिवाजी विद्यापीठही यामध्ये अग्रेसर आहे.



डॉ. पाटील

**प्रश्न-फोटोकॅटॅलिसिस संशोधनाचा उपयोग समाजाला कसा होऊ शकतो?**

उत्तर-हवा, पाणी किंवा काही रसायनांमध्ये विषारी घटक असतात. ते मानवी शरीराला हानिकारक असतात. त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी तसेच ती नष्ट करण्यासाठी फोटोकॅटॅलिसिस प्रक्रिया वापरली जाते. हवा आणि पाणी प्रदूषण कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो. सध्या या प्रक्रियेवर संशोधन सुरू आहे. या प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न-संशोधनातील जागतिक संधी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मिळू शकतात का?**

उत्तर-दक्षिण कोरिया सारख्या देशात शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत. याशिवाय युरोप आणि अमेरिकेतील संशोधन संस्थांमध्येही विद्यापीठाचे विद्यार्थी कार्यरत आहेत. मुळात विद्यार्थ्यांनी धैर्य, दृढनिश्चय, तपश्चर्या आणि विश्वबंधुत्व या चार गोष्टी आत्मसात केल्या पाहिजे. तरच संशोधनात रममाण होता येते. प्रामाणिकपणे आणि सातत्याने संशोधन करणाऱ्या व्यक्तीला यश नक्कीच मिळते. मला सुद्धा संशोधनात सुरुवातीला अपयश आले. माझे प्रोजेक्ट नाकारले गेले. पण मी सातत्य सोडले नाही. नंतर जर्मनीमध्ये नामांकित संस्थेत संशोधनाची संधी मिळाली. आताचे संशोधन करणारे विद्यार्थी हुशार आहेत. त्यांचे भवितव्य नक्कीच उज्वल आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2021
सकाळ

# विद्यापीठ परीक्षांसाठी विलंब शुल्क माफ

**कोल्हापूर, ता. १३ :** शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाने शैक्षणिक मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्याकडून हे शुल्क आकारण्यात येऊ नये, याबाबतचे परिपत्रक मंगळवारी परीक्षा विभागाने काढले आहे.

सध्या महाविद्यालये व अधिविभागांमध्ये विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालय किंवा अधिविभागात विनाविलंब शुल्क भरण्याची तारीख २६ जुलै आहे.

महाविद्यालयांनी विद्यापीठात परीक्षा अर्ज याद्या सादर करण्याची मुदत २८ जुलै आहे. असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

14 JUL 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या परीक्षांसाठी नियमित शुल्कासह २७ जुलैपर्यंत करा अर्ज

## विलंब, अतिविलंब शुल्कात सवलत : कोरोनामुळे निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने उन्हाळी सत्रातील (मार्च-एप्रिल २०२१) पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या विलंब आणि अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दि. २७ जुलैपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज करता येणार आहे.

परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. त्यात पूर्व नियोजनानुसार नियमित शुल्कासह अर्ज भरण्याची आज, बुधवारपर्यंत अंतिम मुदत होती. त्यानंतर विलंब आणि अतिविलंब शुल्काची मुदत विद्यापीठाने

> कोरोनाची स्थितीचा विचार करून विद्यापीठाने परीक्षा अर्जाच्या विलंब, अतिविलंब शुल्कामध्ये शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू.

जाहीर केली होती. मात्र, कोरोनामुळे निर्माण झालेली स्थिती लक्षात घेऊन विद्यापीठाने विलंब, अतिविलंब शुल्कामध्ये शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला. विद्यापीठाकडून ५० विलंब शुल्क, तर ३५० रुपये अतिविलंब शुल्क आकारण्यात येते. पण, या निर्णयामुळे यावर्षी ते आकारले जाणार नाही. आता विद्यार्थ्यांनी महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरण्याची तारीख २६ जुलै, तर महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करण्याची तारीख २८ जुलै आहे. या निर्णयाची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाने संलग्नित अधिविभाग आणि महाविद्यालयांना दिली आहे. दरम्यान, यापूर्वी विद्यापीठाने कोरोनाच्या स्थितीमुळे सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांची परीक्षा शुल्कवाढ स्थगित केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2021
पुढारी

## संक्षिप्त

# बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम. ए. ऑनलाईन परीक्षेला तीन हजार विद्यार्थी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित पुनर्रपरीक्षेंतर्गत मंगळवारी ४५१९ पैकी ३२०४ विद्यार्थ्यांनी मंगळवारी ऑनलाईन परीक्षा दिली. परीक्षा विभागाच्या वतीने मंगळवारी बीए.,बी.कॉम.,बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., बीबीए, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, बी.व्होक, बी.टेक, बी.एस्सी., एम.एस्सी नॅनो सायन्स, एमबीए इन रूरल मॅनेजमेंट, जर्नालिझम आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे विद्यापीठाच्या वतीने निराकरण करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 4 JUL 2021
तरुण भारत

# अग्रणी महाविद्यालयांतर्गत कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत कॉमर्स कॉलेज व विवेकानंद कॉलेजमधील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा उत्साहात पार पडली. 'मत्स्यालय बनविणे व देखभाल : नोकरीच्या संधी' हा या कार्यशाळेचा विषय होता. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. एस. एस. पाटील यांनी मत्स्यालय बनवणे, माशांची देखभाल करणे व संवर्धन करणे, सजावट करणे यातून अनेक नोकरीच्या संधी प्राप्त होत असल्याची माहिती दिली. कार्यशाळेचे महत्व प्रा. एन. ए. पटेल यांनी सांगितले. अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. सी. जे. कांबळे यांनी स्वागत केले. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी कार्यशाळेचे नियोजन केले. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. प्रा. वाय. एस. पुजारी यांनी केले सूत्रसंचालन केले. डॉ. टी. सी. पाटील यांनी आभार मानले. या कार्यशाळेसाठी प्राध्यापक विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2021
तरूण भारत

# परीक्षेच्या विलंब, अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सूट

प्रतिनिधी
कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाचा निर्णय
- परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांच्या अधिविभाग व महाविद्यालयांना सूचना

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील मार्च-एप्रिल उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. या परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सूट देण्याचा निर्णय कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून विलंब किंवा अतिविलंब शुल्क घेऊ नये, अशा सूचना अधिविभाग व महाविद्यालयांना शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनीं परिपत्रकाव्दारे दिल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यामध्ये नियमित शुल्कासह ५ ते २६ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाचे आहेत. महाविद्यालय व अधिविभागांनी २७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. अधिविभाग व महाविद्यालयांनी नियमित शुल्कासह २८ जुलैपर्यंत अर्जांची यादी विद्यापीठाला सादर करावयाची आहे. परीक्षांचे अर्ज भरण्यासंदर्भातील सुधारीत तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय व अधिविभागांनी याची दखल घ्यावी, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2021
तरूण भारत

# कुलसचिव, परीक्षा संचालकांसाठी विद्यापीठातून सर्वाधिक अर्ज

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विविध पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कुलसचिव आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक या दोन पदांसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राध्यापकांचे जास्त अर्ज असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. यामध्ये डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, डॉ. जयदीप बागी, डॉ. भानारकर, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवरांनी दोन्ही पदासाठी अर्ज केले आहेत. या दोन्ही पदासाठी विद्यापीठ वर्तुळातच स्पर्धा लागली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक, चार फॅकल्टी डीन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन



सेंटर संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र संचालक, चार अधिष्ठाता या पदांसाठी ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. विद्यमान कुलसचिवांचा कार्यकाल १७ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक पद तीन वर्षापासून तर क्रीडा संचालक व आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र संचालक पद गेल्या कित्येक वर्षापासून प्रभारी आहे. त्यामुळे ही पदभरती त्वरित करावी, अशी वारंवार मागणी होत होती. अखेर ही पदे भरणार असल्याने विद्यापीठ वर्तुळातून समाधान व्यक्त होत आहे.

## विविध पदांसाठी आलेले अर्ज

| | |
|---|---|
| कुलसचिव | ७३ |
| परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक | ५१ |
| क्रीडा संचालक | २३ |
| वाणिज्य व व्यवस्थापन विभाग अधिष्ठाता | १६ |
| मानव्यशास्त्र अधिष्ठाता | ४३ |
| आंतर विद्याशाखीय अधिष्ठाता | १४ |
| विज्ञान व इलेक्ट्रॉनिक अधिष्ठाता | — |
| आजीवन, अध्ययन व विस्तार केंद्र संचालक | ५२ |
| इन्क्युबेशन सेंटर संचालक | ५० |